Containment Zone ID – Raigad C.Z. २०१


महाराष्ट्रशासन

महसूलववनविभाग

जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग

हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१

❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२३३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖ईमेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना/रुग्ण/वडघर मोहोत-महाड/२०२० दिनांक : 31 /०५/२०२०.

**वाचले:-**

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपाययोजना नियम, २०२०
७. तहसिलदार महाड यांजकडील पत्र क्र.फौजदारी/कात-५/कोविड-१९/केस क्र.६/२०२०,दिनांक ३०/५/२०२०.

---

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यांत आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहे.

शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजी लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र. १ कडील अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी , आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत. करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे. शासनाने कोरोना विषाणूचा ( COVID - १९ ) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन, खंड २, ३, व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील वडघर मोहोत, या गावी १ व्यक्ती करोना विषाणु बाधीत आढळून आल्याचे तहसिलदार महाड यांनी दिनांक ३०/५/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकामी सदरचे रुग्ण राहत असलेले **मौजे वडघर मोहोत, ता.महाड** येथील सदर रूग्ण रहात असलेला परिसर व त्याच्या लगतचा परिसर (१.रमण पांडुरंग चौधरी यांचे घरापासून दक्षिणेकडील संजना श्यामसुंदर चौधी यांचे घरापर्यंतचा भाग, २.सुभाष कृष्णा चौधरी यांच्या घरापासून उत्तरेकडील दिपक चौधरी यांचे वाडयापर्यंत, ३.संतोष पांडुरंग चौधरी यांचे घरापासून ते पश्चिमेकडील विशाल गणेश बावलेकर यांचे घरापर्यंत) हा परिसरContainment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) म्हणून जाहीर करण्यात येत आहे.

सदर परिसरात रहाणाऱ्या नागरिकांना घरातुन बाहेर पडण्यास व अन्य ठिकाणी स्थलांतरीत होण्यास तसेच बाहेरून येणाऱ्या लोकांना सदर बाधीत क्षेत्रात प्रवेश करण्यास मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे प्रतिबंध करीत आहे. सदरचे आदेश हे शेवटचा करोनाबाधित रुग्ण बरा झाल्यापासून पुढील २८ दिवसांपर्यंत लागू राहतील. यामध्ये आरोग्य विभागाकडील अहवालानुसार आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येईल. यासाठी पुनश्च: सुधारीत आदेश निर्गमित करणेत येतील.

तरी अशाप्रकारचा प्रतिबंध लागू असल्याबाबत रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील वरील भागामध्ये व कोरोना विषाणु बाधीत क्षेत्र म्हणुन घोषीत केलेल्या आजुबाजूच्या परिसरात येणारी सर्व महानगरपालिका /नगरपरिषद प्रभाग/गावे यामधील सर्व शासकीय कार्यालये , सार्वजनिक ठिकाणे येथे लेखी नोटीस लावून तसेच दवंडी देवुन मुख्याधिकारी, तलाठी , ग्रामसेवक व पोलीस पाटील यांनी प्रसिध्दी दयावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६० ) च्या कलम १८८ अन्वये कार्यवाई करण्यात येईल.

सही/--

**(निधी चौधरी)**

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**

**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

Collector of Raigad

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्याधिकारी, नगरपालिका महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- उप विभागीय अधिकारी महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
नोडल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड